# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सार्वजनिक आरोग्य खाते

## <u>जाहिरात</u>

मा.महानगरपालिका आयुक्त यांच्या MGC/F/5910/Dt.25.03.2025 या मंजुरीनुसार सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत **पॉलिक्लिनिक व डायग्नॉस्टिक केंद्र** येथील रिक्त पदावर विविध विशेषतज्ञाच्या (कान,नाक व घसा तज्ञ ,जनरल मेडीसीन, बालरोग तज्ञ, त्वचा रोग, अस्थि व्यंग चिकित्सक, नेत्र चिकित्सक, स्त्री-रोग तज्ञ) यांची नेमणूक करण्याकरिता **दि.18/11/2025 सकाळी 11.00** वाजता जाहिरात प्रसारित करण्यात येत आहे.

सदर जाहिरात ही विशेषतज्ञाच्या रिक्त पदे कंत्राटी तत्वावर भरण्याकरीता असून याकरिता **दि.18/11/2025 सकाळी 11.00 ते दि.02/12/2025 संध्याकाळी 06.00** वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने गुगल फॉर्मव्दारे अर्ज मागविण्यात येत आहे. याची सविस्तर माहिती व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर **दि.18/11/2025 ते दि.02/12/2025** या दिवसांकरिता प्रदर्शित करण्यात येईल. गुगल फॉर्मचे तपशील खाली दिलेले आहेत.

| अ.क्र | पदाचे नाव | गुगल फॉर्म |
|---|---|---|
| 1. | कंत्राटी विविध विशेषतज्ञ | https://forms.gle/3TXq91GuTvUTC4vo9 |

| अ.क्र. | पदनाम | मानधन व वयोमर्यादा | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| 1. | **कंत्राटी विविध तज्ञ (Consultant)** | पहिल्या 5 रुग्णांसाठी रु.1500/- प्रति भेट<br>त्यानंतर रु 250/- प्रति रुग्ण<br>कमाल रु. 4,000 प्रति दिन प्रति भेट<br>**वयोमर्यादा:-** दि.01/10/2025 रोजी 70 वयापेक्षा जास्त नसावे | 1. कान,नाक व घसा तज्ञ ,जनरल मेडीसीन, बालरोग तज्ञ, त्वचा रोग, अस्थि व्यंग चिकित्सक, नेत्र चिकित्सक, स्त्री-रोग तज्ञ इत्यादी विषयातील पदवी /पदवीका<br>2. उमेदवार महाराष्ट्र मेडीकल कौन्सिल नोंदणीकृत असावा तसेच Additional Qualfication मेडीकल कौन्सिल कडे नोंदणीकृत असावे व नोंदणीचे नूतनीकरण केलेले असावे.<br>3. संगणक विषयक ज्ञान आवश्यक |

उपरोक्त अर्हता धारण करण्या-या उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने **(गुगल फॉर्म) दि.18/11/2025 सकाळी 11.00 ते दि.02/12/2025 संध्याकाळी 06.00** वाजे पर्यंत अर्ज भरण्यात यावा. यानंतर कागदपत्र पडताळणीसाठी उमेदवारांना ई-मेल व्दारे बोलविण्यात येईल. ई-मेलची खात्री करणे व ई-मेल वेळोवेळी चेक करणे याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची असेल. गुणवत्ता यादी प्रमाणे निवड झालेल्या कंत्राटी विविध विशेषतज्ञ यांना दुरध्वनी व्दारे कळविण्यात येईल. **02/12/2025 संध्याकाळी 06.00** वाजेनंतरचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

विविध तज्ञांना रिक्त पदानुसार व जसे-जसे पॉलिक्लिनीक कार्यान्वीत करण्यात येतील त्यानुसार कागदपत्रांची पडताळणी व सापेक्ष नियुक्ती आदेश देण्यात येतील. ही नियुक्ती प्रथमत 179 दिवसांची असेल जर उमेदवारांचे काम समाधानकारक असेल तर कंत्राटी तत्वावर पुनर्नियुक्ती करण्यात येईल.

सही/-

**कार्यकारी आरोग्य अधिकारी**